# प्रकरण VI

# संनियंत्रण, सामाजिक अंकेक्षण आणि तक्रार निवारण

# प्रकरण VI

# संनियंत्रण, सामाजिक अंकेक्षण आणि तक्रार निवारण

## 6.1 संनियंत्रण


महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम कार्यचालन मार्गदर्शक तत्वांच्या प्रकरण 14 मध्ये गुणवत्ता व्यवस्थापन आणि गुणवत्ता संनियंत्रण यंत्रणेचे पैलू स्पष्ट केले आहेत. ही योजना मालमत्तेच्या निर्मितीशी संबंधित आहे आणि म्हणूनच, निर्माण केलेल्या मालमत्तेचा टिकाऊपणा सुनिश्चित करण्यासाठी, गुणवत्ता व्यवस्थापन महत्वाचे आहे. गुणवत्ता व्यवस्थापनामध्ये प्रकल्प निवड, जागेची निवड, सर्वेक्षण, प्रकल्प आरेखन अंदाजपत्रक, कामाची अंमलबजावणी, पर्यवेक्षण इत्यादींचा समावेश आहे.

तसेच,कार्यचालन मार्गदर्शक तत्वांच्या परिच्छेद 14.4 नुसार, गुणवत्ता व्यवस्थापनाचे तीन भिन्न पैलू आहेत जसे की कार्यस्थळावरील गुणवत्ता नियंत्रण, गुणवत्ता पर्यवेक्षण आणि गुणवत्ता संनियंत्रण. गुणवत्ता व्यवस्थापनाव्यतिरिक्त, राज्य रोजगार हमी परिषद, सामाजिक अंकेक्षण, तक्रार निवारण यंत्रणेद्वारे पारदर्शकता आणि जबाबदारी, लोकायुक्ताची व्यवस्था यांसारखे इतर पैलू देखील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या संनियंत्रणाचा भाग आहेत.

## 6.2 संनियंत्रण यंत्रणा

राज्यातील योजनेचे संनियंत्रण राज्य, जिल्हा आणि गाव पातळीवरील विविध अधिकाऱ्यांवर सोपविले जाते जसे की **आलेख 6.1** मध्ये दर्शविल्याप्रमाणे राज्य रोजगार हमी परिषद, महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण आणि पारदर्शकता सोसायटी, दक्षता आणि संनियंत्रण समित्या, राज्य गुणवत्ता संनियंत्रण, जिल्हा गुणवत्ता संनियंत्रण.

**आलेख 6.1: योजने अंतर्गत संनियंत्रण चौकट**



योजनेंतर्गत संनियंत्रण, मूल्यांकन आणि पुनरावलोकनाशी संबंधित लेखापरीक्षण निष्कर्षांची पुढील परिच्छेदांमध्ये चर्चा केली आहे.

## 6.3 राज्य रोजगार हमी परिषद

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमाच्या कलम 4 नुसार, राज्य शासन एक राज्य रोजगार हमी परिषद स्थापन करेल. परिषदेची कर्तव्ये आणि कार्ये यांत इतर गोष्टींबरोबरच अधिनियम आणि योजनेच्या अंमलबजावणीवर संनियंत्रण ठेवणे हे देखील गृहीत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाने (रोजगार हमी योजना) जानेवारी 2006 मध्ये महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषद[1] स्थापन केली, ज्याची ऑक्टोबर 2011 मध्ये पुनर्रचना करण्यात आली. प्राधान्याची कामे निश्चित करणे, संनियंत्रण आणि निवारण यंत्रणेचा आढावा घेणे आणि सुधारणांची शिफारस करणे, माहितीच्या प्रसारास प्रोत्साहन देणे, अंमलबजावणीवर संनियंत्रण ठेवणे इत्यादी कामांसाठी महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषद जबाबदार होती. तसेच, महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषदेने वर्षातून किमान दोनवेळा बैठक घेऊन राज्य शासनाद्वारे राज्य विधिमंडळासमोर मांडण्यासाठी वार्षिक अहवाल तयार करणे बंधनकारक होते.

वार्षिक अहवाल तयार करणे आणि राज्य विधीमंडळासमोर सादर करणे वगळता महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषदेने वरील जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत की नाही हे लेखापरीक्षणात निश्चित करता आले नाही, कारण लेखापरीक्षणात कोणतेही अभिलेख सादर केले गेले नाहीत.

उत्तरादाखल, नियोजन विभागाचे सहाय्यक संचालक (रोजगार हमी योजना) यांनी असे नमूद केले (ऑगस्ट 2024) की, नियमित बैठका घेतल्या गेल्या नाहीत आणि परिषदेने कोणत्याही सूचना दिल्या नाहीत.

## 6.4 दक्षता व संनियंत्रण समिती

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम कार्यचालन मार्गदर्शक तत्वांच्या परिच्छेद 13.6.1 नुसार, या अधिनियमाच्या अंमलबजावणीतील अनियमितता शोधून काढण्यासाठी आणि सामाजिक अंकेक्षणादरम्यान आढळलेल्या अनियमितता आणि गैरप्रकारांचा पाठपुरावा करण्यासाठी आणि दोषींना शिक्षा होईल आणि चुकीच्या पद्धतीने खर्च केलेल्या निधीची वसुली होईल याची खात्री करण्यासाठी राज्याने त्रिस्तरीय दक्षता यंत्रणेची व्यवस्था करावी. मुख्य दक्षता अधिकारी आणि स्थापत्य अभियंता आणि लेखापरीक्षक यांच्या सहकार्याने राज्यस्तरीय दक्षता कक्ष स्थापन करणे आवश्यक होते. त्याचप्रमाणे जिल्हास्तरीय अधिकाऱ्याचा समावेश असलेला आणि अभियंता व

---

[1] अध्यक्ष: मुख्यमंत्री, उपाध्यक्ष: उपमुख्यमंत्री, कार्यकारी अध्यक्ष: मंत्री (रोजगार हमी योजना), सदस्य सचिव: राज्यमंत्री (रोजगार हमी योजना), सदस्य: मंत्री (ग्रामीण विकास), मंत्री (जलसंधारण), मंत्री (कृषी), प्रधान सचिव (ग्रामीण विकास, रोजगार हमी योजना, नियोजन, कृषी), आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना).

लेखापरीक्षकांच्या सहाय्याने जिल्हास्तरीय दक्षता कक्ष स्थापन करणे आवश्यक होते. तसेच, ग्राम पंचायत स्तरावर दहा सदस्यांची दक्षता व संनियंत्रण समिती स्थापन करणे आवश्यक होते.

महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाने (रोजगार हमी योजना) दिलेल्या माहितीनुसार, राज्यस्तरीय दक्षता कक्षाची स्थापना करण्यात आली होती. तथापि, राज्यस्तरीय दक्षता कक्षाच्या स्थापनेला समर्थन देणारे कागदोपत्री पुरावे लेखापरीक्षणाला सादर करण्यात आले नाहीत. शिवाय, निवडलेल्या सहा जिल्ह्यांपैकी तीन (नागपूर,पालघर आणि छत्रपती संभाजीनगर) मध्ये जिल्हा दक्षता समिती स्थापन करण्यात आली नव्हती.

## 6.5 राज्य/जिल्हा गुणवत्ता संनियंत्रकांद्वारे गुणवत्ता नियंत्रण

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम कार्यचालन मार्गदर्शक तत्वांच्या परिच्छेद 14.7 नुसार, बाह्य संनियंत्रकांद्वारे गुणवत्ता संनियंत्रणामध्ये दोन भाग असतील (i) मंत्रालयाने सूचीबद्ध केलेले राष्ट्रीय पातळीवरील संनियंत्रक आणि (ii) राज्यातील प्रत्येक जिल्ह्यासाठी राज्य गुणवत्ता संनियंत्रक आणि राज्यातील सर्व राज्य गुणवत्ता संनियंत्रणाच्या कामात समन्वय साधण्यासाठी राज्य स्तरावर एक संचालक (गुणवत्ता संनियंत्रक) यांचा समावेश असलेले राज्य गुणवत्ता संनियंत्रण घटक. तांत्रिक बाबींच्या अनुषंगाने कामांची पाहणी/मोजमाप आणि विश्लेषण राज्य गुणवत्ता संनियंत्रकांकडून केले जाईल. भेट दिलेल्या प्रत्येक कामासाठी कामाच्या रचनेच्या आणि अंमलबजावणीच्या विविध पैलूंचे वर्गीकरण राज्य गुणवत्ता संनियंत्रकांकडून वस्तुनिष्ठपणे केले जाईल. किमान पाच टक्के कामे पूर्ण झाल्यानंतर एक वर्षाच्या आत त्यांची तपासणी करणे, मालमत्तेची गुणवत्ता आणि उपयुक्तता व देखभाल बाबींचे मूल्यमापन करणे आणि किमान पाच टक्के कामे प्रगतीपथावर असताना त्यांची तपासणी करणे, सुधारात्मक उपाययोजना करण्यासाठी प्रक्रियेच्या गुणवत्तेच्या पैलूंचे मूल्यमापन करणे आवश्यक आहे, असेही मार्गदर्शक तत्वांमध्ये नमूद करण्यात आले आहे.

नियोजन विभागाने (रोजगार हमी योजना) सादर केलेल्या माहितीनुसार, संचालक (गुणवत्ता संनियंत्रक) यांची नियुक्ती 2022 मध्ये करण्यात आली होती. मात्र, जिल्ह्यातील राज्य गुणवत्ता संनियंत्रक नियुक्त करण्यात आले नव्हते. नियोजन विभाग (रोजगार हमी योजना) यांनी नमूद केले की नियोजन विभाग (रोजगार हमी योजना) यांनी राज्य गुणवत्ता संनियंत्रक नियुक्तीसाठी सादर केलेल्या प्रस्तावाला (जून 2022) वित्त विभाग, महाराष्ट्र शासनाने मान्यता न दिल्याने जिल्हास्तरावर राज्य गुणवत्ता संनियंत्रकाची नियुक्ती करण्यात आली नाही. पुढे असे नमूद करण्यात आले की, 2022-23 मध्ये चार आदिवासी जिल्ह्यांमध्ये म्हणजेच अमरावती, गडचिरोली, नंदुरबार आणि पालघरमध्ये गुणवत्ता नियंत्रण आणि संनियंत्रणासाठी प्रायोगिक तत्वावर तृतीय पक्ष निरीक्षक अभिकरणे नियुक्त करण्यात आली होती. तथापि, आतापर्यंत चार

जिल्ह्यांपैकी अमरावती जिल्ह्यात तृतीय पक्ष निरीक्षक अभिकरणाद्वारे निरीक्षण केले गेले नव्हते.

अश्याप्रकारे, जिल्ह्यात राज्य गुणवत्ता संनियंत्रकांची नेमणूक न होणे, तृतीय पक्ष निरीक्षक अभिकरण नेमलेल्या एका जिल्ह्यात तपासणी न होणे या कारणांमुळे या योजनेंतर्गत निर्माण झालेल्या मालमत्तेचा दर्जा, उपयुक्तता आणि देखभालीची खातरजमा करण्याचे महत्त्वाचे कार्य राज्यात होत नव्हते.

## 6.6 सामाजिक अंकेक्षण

या योजनेंतर्गत ग्रामीण रोजगाराची हमी देण्याच्या सर्व अटींची अंमलबजावणी आणि महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमांतर्गत सर्व खर्चासह मजुरांच्या किमान हक्कांच्या तरतुदींचे दर सहा महिन्यांनी किमान एकदा केंद्र सरकारने विहित केलेल्या पद्धतीने सामाजिक अंकेक्षण केले जाईल.

त्यानुसार, महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाने (रोजगार हमी योजना) सामाजिक अंकेक्षण प्रक्रियेची जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि बळकटीकरण करण्यासाठी, नियोजन, अंमलबजावणी आणि संनियंत्रणासाठी एक स्वतंत्र सामाजिक अंकेक्षण संचालनालय (सप्टेंबर 2013) आणि महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटी ही स्वतंत्र संस्था (डिसेंबर 2017) स्थापन केली. महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटी मध्ये सर्वसाधारण सभा, नियामक मंडळ आणि कार्यकारी समितीचा समावेश होता.

### 6.6.1 सामाजिक अंकेक्षणासाठी निधी

ग्रामीण विकास मंत्रालयाने 2019-20 ते 2023-24 दरम्यान जारी केलेल्या वार्षिक मुख्य परिपत्रकांनुसार, प्रशासकीय खर्चाच्या सहा टक्के राज्याच्या अनुज्ञेयतेतून राज्याच्या सामाजिक अंकेक्षणासाठी 0.5 टक्के पर्यंत राखीव ठेवले होते.

सामाजिक अंकेक्षण कार्यालयासाठी लागणारा निधी मंत्रालयाकडून संबंधित राज्य शासनामार्फत सामाजिक अंकेक्षण कार्यालयाच्या स्वतंत्र बँक खात्यात पाठवला जातो.

राज्य शासनाने 2019-20 ते 2023-24 दरम्यान सामाजिक अंकेक्षणासाठी दिलेला निधी **तक्ता 6.1** मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता 6.1: सामाजिक अंकेक्षणासाठी निधी उपलब्ध करून देणे**

| वर्ष | प्रशासकीय खर्चासाठी मिळालेला निधी (एकूण खर्चाच्या सहा टक्के) | प्राप्त निधीच्या 0.5 टक्के रक्कम विचारात घेता सामाजिक अंकेक्षणासाठी प्राप्त होणारा निधी | सामाजिक अंकेक्षणासाठी मिळालेला निधी | सामाजिक अंकेक्षणासाठी निधीचे कमी वाटप |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5(3-4) |
| (₹ कोटींत) | | | | |
| **2019-20** | 167.85 | 13.99 | 10.51 | 3.48 |
| **2020-21** | 38.63 | 3.22 | 0 | 3.22 |
| **2021-22** | 128.37 | 10.70 | 4.42 | 6.28 |
| **2022-23** | 86.70 | 7.22 | 0 | 7.22 |
| **2023-24** | 160.28 | 13.36 | 7.04 | 6.32 |
| **एकूण** | **581.83** | **48.49** | **21.97** | **26.52** |

*स्त्रोत: नियोजन विभाग (रोजगार हमी योजना) आणि महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटी यांनी सादर केलेली माहिती*

**तक्ता 6.1** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 2020-21 ते 2023-24 दरम्यान महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटीद्वारे सामाजिक अंकेक्षणासाठी प्राप्त निधी एकूण खर्चाच्या 0.5 टक्के या विहित मर्यादेपेक्षा कमी होता आणि ₹ 26.52 कोटी कमी प्राप्त झाले.

**परिच्छेद 6.6.3** मध्ये चर्चा केल्यानुसार सामाजिक अंकेक्षणासाठी लागणारा निधी कमी प्रमाणात मुक्त केल्यामुळे सामाजिक अंकेक्षण कमी प्रमाणात करण्यात आले.

### 6.6.2 राज्य शासनाकडून सामाजिक अंकेक्षण कार्यालयाला निधी उपलब्ध करून देणे

भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने वेळोवेळी जारी केलेल्या वार्षिक मुख्य परिपत्रकांनुसार, राज्य शासनाने निधी प्राप्त झाल्यापासून 15 कामकाज दिवसांच्या आत सामाजिक अंकेक्षण कार्यालयाच्या बँक खात्यात निधी हस्तांतरित होईल याची खात्री करणे आवश्यक आहे.

तसेच, भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने 2019-20 मध्ये जारी केलेल्या निधी मुक्तता आदेशानुसार (28 जानेवारी 2020) असे नमूद करण्यात आले होते की, जर 15 कामकाज दिवसांच्या आत सामाजिक अंकेक्षण कार्यालयाच्या बँक खात्यात निधी हस्तांतरित केला गेला नाही, तर राज्य शासन विलंबाच्या कालावधीसाठी वार्षिक @12 टक्के व्याज देण्यास जबाबदार असेल.

2019-20 ते 2023-24 दरम्यान राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटीला निधी देण्यास केलेला विलंब **तक्ता 6.2** मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता 6.2: महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटीला निधी देण्यास विलंब**

| वर्ष | निधीची रक्कम (₹ कोटींत) | ग्रामीण विकास मंत्रालयाद्वारे निधी मुक्त करण्याची तारीख | सामाजिक अंकेक्षण कार्यालयाच्या खात्यात जमा केल्याची तारीख | विलंब दिवसात | विलंब झालेली रक्कम (₹ कोटीत) |
|---|---|---|---|---|---|
| **2019-20** | 4.55 | 14.03.2019 | 05.04.2019 | -निरंक- | - |
| | 5.96 | 28.01.2020 | 16.03.2020 | 19 दिवस | 5.96 |
| **2020-21** | -निरंक- | -निरंक- | -निरंक- | -निरंक- | - |
| **2021-22** | 4.42 | 31.03.2021 | 29.07.2021 | 69 दिवस | 4.42 |
| **2022-23** | -निरंक- | -निरंक- | -निरंक- | -निरंक- | - |
| **2023-24** | 3.52 | 14.09.2023 | 20.09.2023 | -निरंक- | |
| | 3.52 | 15.02.2024 | 28.03.2024 | 12 दिवस | 3.52 |
| **एकूण** | **21.97** | | | | **13.90** |

***स्त्रोत: महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटीने सादर केलेली माहिती***


**तक्ता 6.2** वरून पाहिल्याप्रमाणे, राज्य शासनाने मुक्त केलेल्या ₹ 21.97 कोटींपैकी ₹ 13.90 कोटी विलंबाने मुक्त झाले आणि हा विलंब 12 दिवसांपासून ते 69 दिवसांपर्यंत होता. तसेच, 2019-20 मध्ये मुक्तता आदेशानुसार ₹3.72 लाख व्याज राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटीला दिले नाही.

### 6.6.3 सामाजिक अंकेक्षणाचे आयोजन

योजनेच्या परिच्छेद 24 (सी) (महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमाच्या अनुसूची II) नुसार प्रत्येक ग्राम पंचायतीचे दर सहा महिन्यांनी किमान एक सामाजिक अंकेक्षण करण्यात यावे.

2019-20 ते 2023-24 या कालावधीत नियोजित आणि केलेल्या सामाजिक अंकेक्षणाचा तपशील **आलेख 6.2** मध्ये दर्शविला आहे.

**आलेख 6.2: नियोजित केलेल्या सामाजिक अंकेक्षणाच्या तुलनेत केलेले सामाजिक अंकेक्षण**




*स्त्रोत: नरेगासॉफ्टमधून घेतलेल्या विदावर आधारित संकलित (मे 2024)*

2019-2020 ते 2023-24 दरम्यान सामाजिक अंकेक्षणासाठी नियोजित ग्राम पंचायतींची संख्या वाढली आहे. तथापि, नियोजित सामाजिक अंकेक्षणाच्या तुलनेत सामाजिक अंकेक्षण आयोजित केलेल्या ग्राम पंचायतींची संख्या 9.44 टक्के (2022-23) आणि 145.84 टक्के (2020-21) होती, तर 2019-20 ते 2023-24 दरम्यान ग्राम पंचायतीच्या एकूण संख्येच्या तुलनेत ग्राम पंचायतीच्या आयोजित केलेल्या सामाजिक अंकेक्षणामध्ये कमतरता 72.43 टक्के आणि 95.67 टक्के दरम्यान होती.

तसेच, निवडलेल्या 48 ग्रामपंचायतींमध्ये, 2019-20 ते 2023-24 दरम्यान आवश्यक 480 सामाजिक अंकेक्षणाच्या ऐवजी, फक्त 25 सामाजिक अंकेक्षण (21 ग्राम पंचायतींमध्ये) करण्यात आले, असेही निदर्शनास आले. अहिल्यानगर जिल्ह्यातील निवडलेल्या आठ ग्राम पंचायतींपैकी कोणत्याही ग्राम पंचायतीमध्ये 2019-20 ते 2023-24 दरम्यान सामाजिक अंकेक्षण करण्यात आले नाही.

उत्तरादाखल,संचालक, सामाजिक अंकेक्षण कार्यालय यांनी नमूद केले (जून 2024) की, सामाजिक अंकेक्षण करण्यासाठी भारत सरकारकडून मिळालेला निधी प्रत्यक्षात वर्षासाठी आवश्यक असलेल्या निधीच्या एक तृतीयांशपेक्षा कमी आहे, ज्यामुळे सामाजिक अंकेक्षण नियोजित सामाजिक अंकेक्षणापेक्षा कमी झाले. अशाप्रकारे, सामाजिक अंकेक्षण करण्यासाठी भारत सरकारकडून मिळणारा निधी केवळ अपुरा नव्हता तर परिच्छेद 6.6.1 मध्ये चर्चा केल्याप्रमाणे राज्य शासनाने सामाजिक अंकेक्षण कार्यालयाला हस्तांतरित केलेला निधीही कमी होता.

अशाप्रकारे, प्रकल्पांच्या अंमलबजावणीमध्ये सार्वजनिक जबाबदारी सुनिश्चित करण्यासाठी योजनेची सतत सार्वजनिक दक्षता घेण्यासाठी एक संस्थात्मक यंत्रणा असलेली सामाजिक अंकेक्षण, निधीच्या कमतरतेमुळे अडचणीत आली.

### 6.6.4 सामाजिक अंकेक्षणाची अभिक्षणे

योजनेच्या परिच्छेद 24 सी (ix) नुसार (महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमाची अनुसूची II), सामाजिक अंकेक्षणाच्या अहवालांवर पद्धतशीर पाठपुरावा कार्यवाही आणि गैरव्यवहार झालेल्या रकमेची वसुली पूर्ण करणे, सामाजिक अंकेक्षणात आढळलेल्या अनियमिततेवर योग्य शिस्तभंगाची किंवा फौजदारी कारवाई पूर्ण करणे हे सामाजिक अंकेक्षण केल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत करणे आवश्यक आहे.

2019-20 ते 2023-24 या कालावधीत महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटीने नोंदवलेल्या मुद्द्यांची संख्या आणि बंद केलेल्या मुद्द्यांची संख्या **तक्ता 6.3** मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता 6.3 :राज्यातील सामाजिक अंकेक्षण अभिक्षणांची प्रलंबितता**

| कालावधी | नोंदवलेल्या मुद्द्यांची एकूण संख्या | बंद झालेल्या एकूण मुद्द्यांची संख्या | प्रलंबित मुद्द्यांची संख्या | प्रलंबित प्रकरणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 2019-20 | 5,038 | 3,253 | 1,785 | **35** |
| 2020-21 | 7,698 | 4,704 | 2,994 | **39** |
| 2021-22 | 9,918 | 7,600 | 2,318 | **23** |
| 2022-23 | 1,772 | 1,077 | 695 | **39** |
| 2023-24 | 12,172 | 6,802 | 5,370 | **44** |
| **एकूण** | **36,598** | **23,436** | **13,162** | **36** |

*स्त्रोत: नरेगासॉफ्टमधून घेतलेल्या विदेवर आधारित संकलित (सप्टेंबर 2024).*

**तक्ता 6.3** मध्ये दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटीने नोंदवलेल्या 36,598 मुद्द्यांपैकी 23,436 मुद्दे बंद करण्यात आले आणि 13,162 (36 टक्के) मुद्दे निकाली निघणे प्रलंबित होते. निवडलेल्या सहा जिल्ह्यांमध्ये, 2019-20 ते 2023-24 या कालावधीत सामाजिक अंकेक्षणा दरम्यान 5,473 अभिक्षणे निदर्शनास आली होती, त्यापैकी 3,045 अभिक्षणे बंद करण्यात आली तर 2,428 अभिक्षणे (44 टक्के) सप्टेंबर 2024 पर्यंत प्रलंबित होती.

राज्यात निपटारा करण्यासाठी प्रलंबित अभिक्षणे 3,636 पर्यंत कमी झाली असून, सहा निवडलेल्या जिल्ह्यांमध्ये सप्टेंबर 2025 पर्यंत प्रलंबित अभिक्षणे 233 पर्यंत कमी झाली.

राज्यात 2019-20 ते 2023-24 दरम्यान सामाजिक अंकेक्षणादरम्यान निदर्शनास आणून देण्यात आलेली आर्थिक गैरव्यवहाराची प्रकरणे, निर्णय घेतलेली प्रकरणे आणि प्रलंबित वसुलीची रक्कम **तक्ता 6.4** मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता 6.4: राज्यातील आर्थिक गैरव्यवहाराची प्रलंबित वसुली**

| वर्ष | महाराष्ट्र राज्य-सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटीने निदर्शनास आणून दिलेल्या आणि निर्णय दिलेल्या प्रकरणांची संख्या (रक्कम ₹ लाखांत) | कारवाई अहवाल अपलोड केलेल्या प्रकरणांची संख्या (रक्कम ₹ लाखांत) | वसुली झालेल्या कारवाई अहवाल प्रकरणांची संख्या (रक्कम लाखांत) | वसुलीची आवश्यकता नसलेल्या कारवाई अहवाल प्रकरणांची संख्या (रक्कम लाखांत) | अपलोड केलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या कारवाई अहवाल प्रकरणांची संख्या (रक्कम लाखांत) | कारवाई अहवाल प्रकरणे अपलोड न झालेल्या प्रकरणांची संख्या (रक्कम ₹ लाखांत) | एकूण प्रलंबित प्रकरणे (रक्कम लाखांत) | प्रलंबित प्रकरणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6=3-4-5 | 7=2-3 | 8=6+7 | 9= (8/2*100) |
| **2019-20** | 226 (194.50) | 226 (194.50) | 57 (28.99) | 165 (162.51) | 4 (3.00) | - | 04 (3.00) | 1.77 |
| **2020-21** | 152 (118.56) | 131 (107.63) | 27 (7.48) | 52 (62.06) | 52 (38.09) | 21 (10.93) | 73 (49.02) | 48.03 |
| **2021-22** | 223 (136.61) | 184 (128.14) | 44 (25.48) | 93 (85.05) | 47 (17.61) | 39 (8.47) | 86 (26.08) | 38.57 |
| **2022-23** | 130 (173.18) | 122 (164.13) | 16 (2.09) | 49 (97.64) | 57 (64.40) | 8 (9.05) | 65 (73.45) | 50.00 |
| **2023-24** | 353 (499.35) | 252 184.84 | 50 (18.26) | 102 (67.46) | 100 (99.12) | 101 (314.51) | 201 (413.63) | 56.94 |
| **एकूण** | **1,084 (1,122.20)** | **915 (779.24)** | **194 (82.30)** | **461 474.72** | **260 (222.22)** | **169 (342.96)** | **429 (565.18)** | **39.58** |
| ***स्त्रोत: नरेगासॉफ्टमधून घेतलेल्या विदेवर आधारित संकलित (जानेवारी 2025)*** | | | | | | | | |

**तक्ता 6.4** मध्ये दर्शविल्याप्रमाणे, 2019-20 ते 2023-24 दरम्यान महाराष्ट्र राज्य-सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटीने निदर्शनास आणलेल्या 1,084 प्रकरणांमध्ये वसूल करावयाच्या ₹ 11.22 कोटींपैकी, कारवाई केलेल्या 429 प्रकरणांतील ₹ 5.65 कोटींची वसुली प्रलंबित होती. 2019-20 या कालावधी पासून महाराष्ट्र राज्य-सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटीने निदर्शनास आणलेल्या प्रकरणांमध्ये गैरव्यवहाराची रक्कम वसूल न करणे हे महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमाचे उल्लंघन होते, ज्यामध्ये सामाजिक अंकेक्षणाद्वारे दर्शविलेली वसुलीची रक्कम सामाजिक अंकेक्षणाच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत वसूल करावी असे नमूद केले होते.

उत्तरादाखल, आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी नमूद केले (जून 2025) की, गैरव्यवहार झालेल्या रकमेची वसूली कालबद्ध पद्धतीने करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

सप्टेंबर 2025 पर्यंत, ₹ 4.44 कोटी रकमेच्या 314 प्रकरणांवर वसुली कारवाई प्रलंबित होती.

## 6.7 तक्रार निवारण यंत्रणा

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमाच्या कलम 6-1 एफ नुसार, राज्य शासन, योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात कोणत्याही व्यक्तीच्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी तालुका स्तरावर आणि जिल्हा स्तरावर योग्य तक्रार निवारण यंत्रणा नियमाद्वारे निश्चित करून अशा तक्रारींचा निपटारा करण्याची कार्यपद्धती निश्चित करेल. तसेच, महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमाच्या कलम 12 ब (5) नुसार तक्रारींचा निपटारा सात दिवसांच्या आत करणे आवश्यक आहे.

कार्यचालन मार्गदर्शक तत्वांच्या परिच्छेद 13.13.1(xi) मध्ये, प्राप्त झालेल्या आणि निपटारा केलेल्या तक्रारींबाबतचा मासिक अहवाल ग्राम पंचायतीकडून कार्यक्रम अधिकारी, जिल्हा कार्यक्रम समन्वयक आणि राज्य शासन यांच्यामार्फत भारत सरकारकडे पाठविणे आवश्यक आहे. हे सारे संकेतस्थळावर ठेवणे आवश्यक आहे.

विभागाने तक्रारी स्वीकारण्याचे अनेक मार्ग स्थापित केले होते जसे की लेखी तक्रारी, दूरध्वनी, मदत संपर्क क्रमांक, संकेतस्थळ इत्यादी.

निवडलेल्या सहा जिल्ह्यांमध्ये 2019-20 ते 2023-24 दरम्यान प्राप्त झालेल्या आणि निकाली काढलेल्या तक्रारींची स्थिती **तक्ता 6.5** मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता 6.5: 2019-20 ते 2023-24 दरम्यान प्राप्त झालेल्या आणि निपटारा केलेल्या तक्रारींची स्थिती**

| जिल्ह्याचे नाव | एकूण तक्रारींची संख्या | निकाली काढलेल्या | प्रलंबित |
|---|---|---|---|
| अहिल्यानगर | 210 | 150 | 60 |
| अमरावती | 285 | 273 | 12 |
| छत्रपती संभाजीनगर | 57 | 16 | 41 |
| धाराशिव | 11 | 11 | 0 |
| नागपूर | 22 | 22 | 0 |
| पालघर | 4 | 4 | 0 |
| **एकूण** | **589** | **476** | **113** |
| *स्त्रोत: निवडलेल्या जिल्ह्यांच्या उपजिल्हाधिकारी (रोजगार हमी योजना) यांनी दिलेली माहिती* | | | |

**तक्ता 6.5** मध्ये दर्शविल्याप्रमाणे, प्राप्त 589 तक्रारींपैकी 476 तक्रारी निकाली काढण्यात आल्या, तर 113 तक्रारी (19 टक्के) प्रलंबित होत्या. या 113 प्रलंबित तक्रारींपैकी 62[2] तक्रारी (55 टक्के) 2023-24 पूर्वीच्या कालावधीतील होत्या.

480 लाभार्थ्यांच्या सर्वेक्षणादरम्यान, 233 लाभार्थ्यांनी (49 टक्के) असे उत्तर दिले की त्यांना कार्यक्रम अधिकारी आणि जिल्हा कार्यक्रम समन्वयक स्तरावर उपलब्ध असलेल्या तक्रार निवारण यंत्रणेबद्दल माहिती नव्हती.

उत्तरादाखल, आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी असे नमूद केले (जून 2025) की, संबंधित जिल्ह्यांना तक्रार निवारण यंत्रणेबाबत जनजागृती करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

[2] 2019-20:15; 2020-21: 4; 2021-22:19, 2022-23: 24

### 6.7.1 लोकायुक्तांची नियुक्ती

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमाच्या अनुसूची II च्या परिच्छेद 29 नुसार, प्रत्येक जिल्हयासाठी जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार तक्रारी प्राप्त करण्यासाठी, चौकशी करण्यासाठी आणि निवाडे मंजूर करण्यासाठी एक लोकायुक्त असेल.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या कार्यचालन मार्गदर्शक तत्वांच्या परिच्छेद 13.14.1 नुसार, पारदर्शकता आणि जबाबदारीच्या तत्वांचे पालन करून, राज्य शासन महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीबाबतच्या तक्रारींचे जलद निवारण करण्यासाठी सर्व जिल्हयांमध्ये लोकायुक्त कार्यालयाची स्थापना करण्यात येईल.

तसेच, मार्गदर्शक तत्वांच्या परिच्छेद 13.14.3 नुसार लोकायुक्तांचा मासिक आणि वार्षिक अहवाल आणि मंजूर निवाड्यांची यादी मुख्य सचिव आणि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या प्रभारी सचिवांना पाठविला जाईल. या अहवालात, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या दोषी अधिकाऱ्यांच्या कारवाईवर लोकायुक्त प्रकाश टाकतील.

आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम) यांनी दिलेल्या माहितीवरून लेखापरीक्षणात ही योजना कार्यान्वित असलेल्या 34 जिल्हयांपैकी केवळ 25 जिल्हयांत लोकायुक्तांची नेमणूक करण्यात आली असून उर्वरित नऊ[3] जिल्हयांमध्ये लोकायुक्त नेमणूक करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले. तसेच, जिल्हा लोकायुक्तांनी मंजूर केलेल्या निवाड्यांच्या यादीसह मासिक व वार्षिक अहवाल, लेखापरीक्षणासाठी सादर करण्यात आले नाहीत.

निवडलेल्या सहा जिल्हयांमध्ये 2019-20 ते 2023-24 दरम्यान लोकायुक्ताचे पद रिक्त होते त्या कालावधीची माहिती **तक्ता 6.6** मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता 6.6: लोकायुक्ताचे पद रिक्त असलेले कालांतर**

| जिल्हयाचे नाव | 2019-20 ते 2023-24 या कालावधीत लोकायुक्ताचे पद रिक्त असलेले कालांतर |
|---|---|
| **अहिल्यानगर** | 8 महिने, 3 महिने आणि 6 महिने |
| **अमरावती** | 9 महिने आणि 6 महिने, |
| **छत्रपती संभाजीनगर** | 17 महिने आणि 12 महिने |
| **धाराशिव** | 10 महिने आणि एक महिना |
| **नागपूर** | 34 महिने आणि 5 महिने |
| **पालघर** | 34 महिने आणि 5 महिने |
| ***स्त्रोत: निवडलेल्या जिल्हयांच्या उपजिल्हाधिकाऱ्यांनी सादर केलेली माहिती*** | |

[3] धुळे, नंदुरबार, छत्रपती संभाजीनगर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सांगली, सातारा आणि कोल्हापूर.

**तक्ता 6.6** मध्ये दर्शविल्याप्रमाणे, निवडलेल्या सहा जिल्ह्यांमध्ये लोकायुक्ताचे पद तीन महिन्यांपासून 34 महिन्यांपर्यंत रिक्त होते.

शिवाय, सर्वेक्षणात सहभागी झालेल्या 480 लाभार्थ्यांपैकी 350 लाभार्थ्यांनी (73 टक्के) तक्रार निवारणासाठी लोकायुक्त असल्याचे माहित नव्हते असे उत्तर दिले.

उत्तरादाखल, आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी असे नमूद केले (मे 2025) की, सध्या राज्यात 12 लोकायुक्त कार्यरत असून रिक्त पदे लवकरात लवकर भरण्याची विनंती विभागाला करण्यात येत आहे.

## 6.8 योजनेचा प्रभाव अभ्यास

या योजनेच्या उद्दिष्टांमध्ये ग्रामीण भारतातील सर्वात असुरक्षित लोकांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून सामाजिक संरक्षण, टिकाऊ मालमत्ता निर्माण करून गरिबांसाठी उपजीविका सुरक्षा प्रदान करणे, सुधारित पाणी सुरक्षा इत्यादींचा समावेश होता.

या योजनेचा उपजीविका सुरक्षा, उत्पन्न पातळी वाढवण्यावर होणाऱ्या प्रभावाचे मूल्यांकन करण्यासाठी राज्य शासनाने मूल्यांकन अभ्यास केला नसल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले.

उत्तरादाखल, आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी असे नमूद केले (जून 2025) की, मूल्यांकन अभ्यास केला जाईल.

## निष्कर्ष

अधिनियम आणि योजनेच्या अंमलबजावणीवर संनियंत्रण ठेवण्यासाठी नियुक्त केलेल्या महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषदेने नियमितपणे बैठका घेतल्या नाहीत. गुणवत्ता संनियंत्रणासाठी, राज्य पातळीवर राज्य गुणवत्ता संनियंत्रण संचालक नियुक्त केले गेले असताना, जिल्ह्यांसाठी राज्य गुणवत्ता संनियंत्रक नियुक्त केले गेले नाहीत. 2019-20 ते 2023-24 या कालावधीत ग्राम पंचायतींमध्ये 72.43 टक्के ते 95.67 टक्के कमतरतेसह सामाजिक संकेक्षणात उणीव होती. शिवाय, सामाजिक संकेक्षण कार्यालयाने निदर्शनास आणून दिलेल्या 1,084 गैरव्यवहार प्रकरणांमध्ये वसुलीसाठी शोधून काढलेल्या ₹ 11.22 कोटींपैकी, ₹ 4.44 कोटींच्या 314 प्रकरणांमध्ये वसुलीची कारवाई अद्याप प्रलंबित आहे. या त्रुटी कमकुवत संनियंत्रण आणि अनियमिततेचा अपुरा पाठपुरावा अधोरेखित करतात.

**शिफारशी**

***शिफारस क्र. 7: शासनाने सर्व जिल्ह्यांमध्ये राज्य गुणवत्ता नियंत्रकांची नियुक्ती जलद गतीने करावी.***

***शिफारस क्र. 8: शासनाने विहित निकषांनुसार सामाजिक अंकेक्षण करावे आणि महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमातील तरतुदींनुसार सामाजिक अंकेक्षण कार्यालयाने निदर्शनास आणून दिलेल्या आर्थिक गैरव्यवहाराची वसुली जलद गतीने करावी.***

**(डी. जयशंकर)**
प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I,
महाराष्ट्र, मुंबई

मुंबई
दिनांकः 03 फेब्रुवारी 2026

प्रतिहस्ताक्षरीत

**(के. संजय मूर्ती)**
भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक

नवी दिल्ली
दिनांकः 05 फेब्रुवारी 2026